


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25
वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११० । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । ०८/०५/२०२६ । पान - ६







# मोकळ्या इमारती आणि जागा बनले गर्दुल्यांचे अड्डे

## पोलीस आणि नगरपालीका प्रशासनापुढे अवैध व्यावसा यांचे आव्हान




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून मोकळे भूखंड, पडके वाडे, दुर्लक्षित गार्डन, नदीकाठचे परिसर आणि ओसाड जागा या आता अवैध धंदे व गुन्हेगारी कारवायांचे केंद्र बनू लागल्या आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये दारूडे, गंजाडी, गर्दुल्ले, जुगारी आणि नशेखोर टोळक्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे या टोळक्यांमध्ये काही अल्पवयीन मुलांचाही समावेश असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

पोलिस प्रशासनाची प्राथमिकता अवैध धंदे बंद करणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, महिला व मुलींचे संरक्षण करणे आणि शहरातील शांतता कायम राखणे ही असायला हवी. मात्र प्रत्यक्षात पोलिस यंत्रणा या मूलभूत जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शहरातील वाढती गुन्हेगारी, खुलेआम सुरू असलेले नशेचे प्रकार आणि संशयास्पद हालचाली यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत.

शहरातील अनेक ओसाड जागांवर रात्री उशिरापर्यंत टोळक्यांची गर्दी दिसून येते. काही ठिकाणी दारूच्या बाटल्या, नशेच्या गोळ्यांचे अवशेष, गांजाचे सेवन आणि जुगाराचे प्रकार उघडपणे सुरू असल्याचे स्थानिक नागरिक सांगतात. अनेक वेळा नशेच्या अवस्थेत काही जण सार्वजनिक ठिकाणी पडलेले दिसतात. यामुळे महिलांना, विद्यार्थिनींना तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः शहरातील पडके वाडे, बंद शॉपिंग कॉम्प्लेक्स, दुर्लक्षित बागा आणि नदीकाठचे भाग हे समाजकंटकांसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहेत. पोलिसांकडून या भागांमध्ये प्रभावी गस्त घातली जात नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत असल्याचे बोलले जात आहे. काही नागरिकांनी संबंधित भागांमध्ये रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली वाढल्याची तक्रार केली आहे.

दरम्यान, नगरपालिकेने स्थापन केलेले रक्षक दल शहरातील वाहतूक, किरकोळ वाद आणि सार्वजनिक शिस्त राखण्यासाठी काही प्रमाणात चांगले काम करत असल्याचे दिसते. मात्र त्यांना कायदेशीर कारवाईचे अधिकार मर्यादित असल्याने गंभीर गुन्हेगारी रोखण्यात त्यांची क्षमता अपुरी पडत आहे. परिणामी गुन्हेगारी नियंत्रणासाठी पोलिस यंत्रणाच प्रभावी भूमिका बजावणे अपेक्षित असताना ती कुचकामी ठरत असल्याची टीका होत आहे.

नागरिकांच्या मते, शहरातील वाढत्या अवैध धंद्यांना राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण मिळत असल्यानेच कारवाई होत नसल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी आता केवळ कागदी कारवाई न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शहरातील मोकळे भूखंड, धोकादायक व पडके बांधकाम, बंद वादग्रस्त शॉपिंग कॉम्प्लेक्स तसेच अवैध धंद्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या ठिकाणांवर नगरपालिकेने तातडीने कारवाई करावी अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. तसेच पोलिस प्रशासनाने नियमित गस्त वाढवून अशा ठिकाणांची तपासणी मोहीम राबवावी, अन्यथा भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# संगमनेर एमआयडीसीची कार्यवाही दोन महिन्यांत सुरू होणार – सामंत

## आ. खताळांना शुभेच्छा देण्यासाठी मंत्री संगमनेरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शासकीय समित्यांमध्ये ठरल्याप्रमाणे शिवसेनेला प्राधान्य मिळाले पाहिजे. याविषयी आपण पालकमंत्र्यांशी चर्चा करणार असून शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही असा विश्वास अहिल्यानगरचे संपर्कप्रमुख व राज्याचे उद्योगमंत्री उदय सामान त्यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांना दिला

नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदी निवड झाल्यानंतर नूतन संपर्कप्रमुख उदय सामंत हे प्रथमच संगमनेरला शिवसेना महायुतीचे आमदार अमोल खताळ पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात बैठकीसाठी आले होते सर्वप्रथम त्यांचे आमदार अमोल खताळ यांनी स्वागत केले यावेळी शिवसेना महायुतीचे आमदार अमोल खताळ पाटील शिर्डीचे माजी खासदार सदाशिव लोखंडे शिवसेना जिल्हा प्रमुख कमलाकर कोते प्रवक्ते संजीव भोर युवासेना जिल्हाप्रमुख शुभम वाघ जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे उपजिल्हाप्रमुख मारुती मेंगाळ जगन देशमुख रमेश काळे रणजित ढेरंगे तुषार गजे ज्येष्ठ नेते संतोष रोहम तालुका प्रमुख रामभाऊ राहणे राजेंद्र सोनवणे तालुका संघटक मंजा बापू साळवे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी नगर सेविका साक्षी सूर्यवंशी महिला उपजिल्हाप्रमुख दिपाली वाव्हळ युवा सेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख तालुकाप्रमुख सुशील शेवाळे शहर प्रमुख सार्थक शेवाळे यांच्यासह शिवसेना महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपर्कप्रमुख सामंत म्हणाले की शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर नाशिक व अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांच्या संपर्क प्रमुखपदाची जबाबदारी सोपवली आहे., त्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील दोन लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेतल्यानंतर आता अहिल्यानगर (पान ३ वर)




# विकास आणि जनसेवेचा ध्यास घेणाऱ्या नेतृत्वाला सलाम

जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी सतत झटणारे, विकासाला प्राधान्य देणारे आणि सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणजे मा. आमदार अमोल खताळ पाटील.

दि. ८ मे हा त्यांचा वाढदिवस संपूर्ण संगमनेर तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये रक्तदान शिबिर, अन्नदान, वृक्षारोपण, तसेच गरजू नागरिकांना मदत अशा उपक्रमांचा समावेश आहे.

आमदार अमोल खताळ पाटील यांनी आपल्या कार्यकाळात मतदारसंघाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात त्यांनी प्रभावी कामगिरी केली असून, जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात.


त्यांची कार्यशैली ही सर्वसामान्यांशी जोडलेली असून, प्रत्येक नागरिकाशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर त्यांनी भर दिला आहे. त्यामुळेच ते जनतेचे खरे प्रतिनिधी म्हणून ओळखले जातात.

सत्तेपेक्षा सेवा मोठी हा विचार अंगीकारून त्यांनी नेहमीच जनतेच्या हितासाठी काम केले आहे. संकटाच्या काळात नागरिकांना मदतीचा हात देत त्यांनी एक संवेदनशील नेतृत्व म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

युवा पिढीसाठी ते एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक युवक समाजकार्यात सक्रिय होत आहेत. त्यांची काम करण्याची जिद्द, लोकांशी असलेला जवळचा संपर्क आणि विकासाची दृष्टी यामुळे ते आज संगमनेरच्या राजकारणात एक मजबूत व विश्वासार्ह चेहरा बनले आहेत. त्यांचा वाढदिवस हा केवळ उत्सव नसून, समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. त्यामुळेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक कार्यकर्ते सामाजिक उपक्रम राबवत समाजसेवेचा संदेश देत आहेत. त्यांना निरोगी आयुष्य लाभो व त्यांच्या हातून आणखी विकासकामे घडत राहो, हीच सदिच्छा.

**शुभेच्छुक - सार्थक शेवाळे**
**शहर प्रमुख,**
**शिवसेना युवा सेना, संगमनेर**






# भोंदूबाबा खरातच्या लॉकरमधून कोट्यवधींचा ऐवज जप्त; ईडीच्या कारवाईने खळबळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - महिलांचे लैंगिक शोषण, खंडणी आणि मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) नाशिकमधील 'विश्वास को-ऑपरेटिव्ह बँक' येथील अशोक खरात आणि त्यांची पत्नी कल्पना खरात यांच्या नावावरील लॉकरची झडती घेत मोठ्या प्रमाणात सोन्या-चांदीचे दागिने, परदेशी चलन आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. ही कारवाई खरात यांच्या मुलीच्या उपस्थितीत करण्यात आली.

ईडीच्या तपासादरम्यान लॉकरमधून तब्बल १.१० कोटी रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ५५०० अमेरिकन डॉलर (सुमारे ५.१९ लाख रुपये) परदेशी चलन तसेच १.८९ लाख रुपयांचे चांदीचे दागिने जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे तपास यंत्रणांमध्येही खळबळ उडाली असून, खरात याच्या आर्थिक व्यवहारांचा तपास अधिक वेगाने सुरू करण्यात आला आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यात ईडीने नाशिक, पुणे आणि शिर्डी येथील खरात याच्याशी संबंधित विविध ठिकाणी छापेमारी केली होती. त्या कारवाईत २.४ कोटी रुपयांचा बँक निधी गोठवण्यात आला होता. तसेच ४२ लाख रुपये रोख रक्कम आणि कोट्यवधींच्या सुमारे ९० मालमत्तांची कागदपत्रे जप्त करण्यात आली होती. याशिवाय खरात याच्याशी संबंधित आलिशान 'मर्सिडीज-बेंझ' कारही जप्त करण्यात आली आहे.

दरम्यान, नाशिक पोलिसांनी मार्च महिन्यात एका बांधकाम व्यावसायिकाच्या तक्रारीवरून अशोक खरात विरोधात गुन्हा दाखल केला होता. २०१८-१९ दरम्यान विविध कारणे सांगून संबंधित व्यावसायिकाकडून ४ ते ५ कोटी रुपये उकळल्याचा आरोप त्याच्यावर आहे. तसेच ९० लाख रुपये किमतीची लक्झरी कार स्वत:च्या नावावर करून घेण्यासाठी दबाव टाकल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या आधारे ईडीने मनी लॉन्ड्रिंगचा तपास सुरू केला.

तपासादरम्यान खरात आणि त्याच्या निकटवर्तीयांच्या नियंत्रणाखालील तब्बल ६० बँक खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोख रकमा जमा झाल्याचे समोर आले आहे. 'दैवी शक्ती' आणि 'मंत्रावलेली वस्तू' असल्याचे सांगून भक्तांना महागड्या दरात वस्तू विकून कोट्यवधी रुपये जमा केल्याचा संशय ईडीला आहे. या पैशांतून अनेक भूखंड आणि मालमत्ता खरेदी केल्याची माहिती तपासात समोर येत आहे.

ईडीच्या या कारवाईनंतर अशोक खरात प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# घारगाव जि. प. शाळेत चोरी

## दोन एलईडी संच व सीसीटिव्ही यंत्रणेवर चोरट्यांचा डल्ला




युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव- संगमनेर तालुक्यातील पठार भागातील घारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. शाळेला उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्याने शाळा बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी डिजिटल शिक्षणासाठी वापरले जाणारे दोन एलईडी संच आणि सीसीटीव्ही यंत्रणेवर डल्ला मारला आहे. या घटनेमुळे परिसरात सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सध्या शाळांना उन्हाळ्याची सुट्टी सुरू आहे. बुधवारी (दि. ६ मे) सकाळी शाळा परिसरात व्यायामासाठी गेलेल्या काही तरुणांना शाळेच्या ऑफिसचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. त्यांनी तातडीने मुख्याध्यापक आणि ग्रामस्थांना ही माहिती दिली. सर्वांनी घटनास्थळी धाव घेतली असता, ऑफिसचे कुलूप तोडलेले दिसून आले. चोरट्यांनी शाळेतील दोन ४२ इंची एलईडी टीव्ही, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डीव्हीआर आणि स्क्रीन चोरून नेली आहे. चोरी करण्यापूर्वी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे तोडून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

यापूर्वी चार वर्षांपूर्वी देखील याच शाळेत चौरी झाली होती, मात्र त्या घटनेचा छडा लागला नाही. मागील चोरी पचल्यामुळेचं चोरट्यांनी पुन्हा शाळेला लक्ष्य करण्याचे धाडस केले असल्याची शक्यता शिक्षक भाऊसाहेब ढोकरे यांनी व्यक्त केली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश आ हैर यांनी घारगाव पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वारंवार होणाऱ्या चोऱ्यांचा तपास लागत नसल्याने गुन्हेगारांना मोकळे ग्रन मिळाले आहे. या चोरीचा तपास लागलाच पाहिजे, अन्यथा ग्रामस्थांना रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

याप्रसंगी मुख्याध्यापक शांताराम आंबरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश आहेर, ग्रामपंचायत सदस्य मंगेश कानोरे, किशोर आहेर, आरिफ शेख, गणेश भोसले, शिक्षक उत्तम तळपे, रंगनाथ गारे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# जनतानगरात अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळा





अखंड हरिनाम सप्ताह, जनतानगर ७/०५/२०२६ १४/०५/२०२६

युवावार्ता (सदाशिव मुळे)

संगमनेर - संगमनेर शहरातील जनतानगर (पश्चिम) येथे ७ मे पासून ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सुरू झाला आहे. या सप्ताह श्री संत चोखामेळा व संत मुक्ताई समाधी सोहळ्यानिमित्त ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली होत आहे. या सप्ताहात दैनंदिन काकडा भजन, संत तुकाराम महाराज गाथा पारायण चरित्र व गाथा निरूपण, हारिपाठ व रात्री ७ ते ९ किर्तन व त्यानंतर हरि जागर असे दैनिक कार्यक्रम आहे.

दुपारी ४ ते ५.३० वेळेत आळंदी येथील ह.भ.प. रामायणाचार्य तुषार महाराज खातळे हे आदिशक्ती मुक्ताई व संत चोखामेळा संगित चरित्र कथा करणार आहे.

दैनिक किर्तनात आळंदी येथील ह.भ.प. निर्मलनाथ महाराज, ह.भ.प बाळकृष्ण महाराज कर्पे, ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगांवकर, ह.भ.प. कविराज महाराज झावरे, ह.भ.प. महादेव महाराज राऊत, ह.भ.प. शेखर महाराज जांभुळकर,व काल्याचे किर्तन ह.भ.प. उमेश महाराज दशरथे अशा पद्धतीने साप्ताहिक कार्यक्रम आहेत. तरी या कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन सप्ताह कमिटीने केले आहे.

# सरकार ॲक्शन मोडवर, ३७ आरोपी पोलिसांच्या रडारवर




अहिल्यानगर (प्रतिनिधी)

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या निघृण अत्याचार आणि हत्या प्रकरणानंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात असताना आता प्रशासनाने मोठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या प्रकरणाचा तातडीने निकाल लागावा यासाठी फास्ट ट्रॅक ट्रायल कोर्ट स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, दुसरीकडे पोक्सो कायद्यातील सराईत आरोपींवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. पुनरावृत्ती करणाऱ्या आरोपींना पोलिसांच्या देखरेखीखाली ठेवण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासन आता अधिक कठोर भूमिकेत दिसत आहे.

पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या घटनेनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी विविध स्तरातून करण्यात येत आहे. वाढता जनक्षोभ आणि प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता राज्य सरकारने आता या खटल्याचा जलदगतीने निकाल लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली आहेत. प्रशासनाने या प्रकरणाकडे अत्यंत संवेदनशीलतेने पाहत न्यायप्रक्रिया वेगाने पार पाडण्याचे संकेत दिले आहेत.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार आणि उच्च न्यायालयाच्या परवानगीने या प्रकरणासाठी विशेष फास्ट ट्रॅक ट्रायल कोर्ट उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, या न्यायप्रक्रियेसाठी विशेष तज्ज्ञांची नेमणूक केली जाणार आहे. प्रकरणातील पुरावे, साक्षी आणि तपास यांची जलद सुनावणी व्हावी यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत केली जाणार आहे. त्यामुळे या खटल्याचा निकाल कमी कालावधीत लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या घटनेनंतर पुणे जिल्हा पोलिस प्रशासनही अधिक सतर्क झाले आहे. पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हे करणाऱ्या आणि अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती करणाऱ्या आरोपींवर विशेष लक्ष ठेवण्याचा निर्णय पोलिसांनी घेतला आहे. दोन किंवा त्यापेक्षा अधिक गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या ३७ आरोपींना पोलिसांच्या थेट देखरेखीखाली ठेवण्यात येणार आहे. याशिवाय १९३ संशयितांची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली असून त्यांच्या हालचालींवरही बारकाईने नजर ठेवली जाणार आहे. पोलिस प्रशासनाकडून या आरोपींकडून चांगल्या वर्तणुकीचे बॉण्ड भरून घेतले जाणार आहेत. तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची तयारीही सुरू करण्यात आली आहे.

सराईत आरोपींवर सतत लक्ष ठेवण्यासाठी स्थानिक पोलिस ठाण्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. अल्पवयीन मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी ही मोहीम राबवली जात असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# सुनेत्रा पवार यांचा राजीनामा



मुंबई (वृत्तसंस्था)

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा उपराष्ट्रपतीसी.पी राधाकृष्णन यांच्याकडे सोपवला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या बारामतीतील पोटनिवडणूकीचा निकाल जाहीर झाला. यामधी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा दणदणीत विजय झाला. यानंतर त्यांनी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला. आज सकाळीच त्या दिल्लीमध्ये दाखल झाल्या होत्या. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन यांच्याकडे त्यांनी राजीनामा सोपवला.

४ मे रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या दोन महत्वपूर्ण पोटनिवडणूकांचे निकल जाहीर झाला. यामध्ये बारामतीमध्ये ऐतिहासिक निकाल लागला. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या या मतदारसंघात त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी दणदणीत विजय मिळवत मोठ्या मताधिक्यांनी त्या निवडून आल्या. या विजयानंतर त्यांना आमदारकी मिळाली आहे, यामुळे त्यांना खासदार हे पद सोडावे लागले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी २ लाख १८ हजार ९३० मते मिळवत अभूतपूर्व विजय संपादन केला आहे. या विजयासह त्यांनी २०१९ मध्ये अजित पवारांनी प्रस्थापित केलेला मताधिक्याचा विक्रम मोडीत काढला असून बारामतीत एक नवा इतिहास रचला आहे.

# महानगरच्या अध्यक्षांनी घेतली अण्णांची भेट



**प्रसिद्ध समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांची महानगर सहकारी बँकेच्या अध्यक्ष गितांजलीताई शेळके यांनी स्नेह भेट घेतली. यावेळी त्यांनी महानगगर बँकेच्या प्रगतीची माहिती देऊन त्यांनी बँकेचे संस्थापक सॉ. गुलाबराव शेळके यांच्या आठवणी जागवल्या.**

# राज्यात उष्णतेच्या लाटेसोबत पावसाचा कहर

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात मे महिन्याच्या सुरुवातीलाच निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. राज्यावर सध्या उष्णतेची लाट आणि अवकाळी पाऊस अशा दुहेरी संकटाचे सावट असून, हवामान विभागाने ७ मे रोजी राज्यातील १४ जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी केला आहे. विदर्भासह उत्तर महाराष्ट्रात तापमानाचा पारा ४४ अंशांच्या उंबरठ्यावर असतानाच, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार, कोकण किनारपट्टीवर सध्या प्रचंड आर्द्रता वाढल्याने मुंबईकर घामाच्या धारांनी हैराण झाले आहेत. रायगड ते सिंधुदुर्गपर्यंतच्या पट्ट्यात उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिक हैराण झाले असून, पुढील ७२ तास हीच स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे दक्षिण कोकणात उकाड्यासोबतच पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहणार असून घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक असेल. उत्तर महाराष्ट्रात जळगाव आणि धुळ्यात उष्णतेचा कहर सुरूच असून तिथे पारा ४४ अंशांच्या पार जाण्याची भीती आहे.

# कै. तानाजीराव करंजेकर - अजातशत्रू व्यक्तिमत्व

## भावपूर्ण श्रद्धांजली...



आमचे स्नेही कै. तानाजीराव करंजेकर यांचे निधन सर्वांना दुःखदायक आहे. करंजेकर साहेब म्हणजे शांत, प्रेमळ व्यक्तिमत्व आणि सर्वांना सहकार्य करण्याची भावना अशी त्यांची ओळख आहे. ते स्टेट बँक संगमनेरमध्ये नोकरीला असताना काही कामानिमित्त त्यांना भेटलो आणि आमचा स्नेह परिचय वाढत गेला. त्यांच्या पत्नी शीलाताई करंजेकर या सुद्धा अतिशय उपक्रमशील व सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांना नोकरीची किंवा व्यवसायाची गरज नसतानाही त्यांनी शिवण कलेचे कोर्सेस, महिलांना प्रशिक्षण देणारे कोर्सेस राबवून हजारो महिलांना स्वावलंबी केले. यासाठी तानाजीराव करंजेकर साहेबांचा त्यांना पाठिंबा, सहकार्य अतिशय मोलाचे होते. त्यांचे चिरंजीव डॉ. विकास करंजेकर हे सुद्धा शांत सस्वभावी व प्रेमळ व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी रोटरी क्लब मध्ये केलेले कार्य तसेच वैद्यकीय संघटनेमध्ये केलेले कार्य उल्लेखनीय असून आई-वडिलांच्या सेवेचा वारसा ते पुढे चालवीत आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांना शारीरिक त्रास झाल्यानंतर त्यांनी आरोग्य संवर्धनासाठी फार प्रयत्न केले. माझे जिवलग स्नेही असल्याने आम्ही सातत्याने सकाळी एकत्र व्यायाम करून एकमेकांना प्रेम दिले. मैत्री वृद्धिंगत झाली. आमच्या भगिनी शीलाताईंनी व कुटुंबाने कै. तानाजीराव करंजेकर साहेबांची फार मनोभावे सेवा केली. अखेरच्या क्षणापर्यंत ते बोलत असायचे. त्यांना मित्रांना भेटण्याची इच्छा असायची आणि म्हणून जेव्हा जेव्हा त्यांच्या घरी आमच्या भेटी झाल्या तेव्हा त्यांना आनंद व्हायचा. तानाजीराव करंजेकर साहेबांनी भारतीय हवाई दलात आणि त्यानंतर भारतीय स्टेट बँकेतही सेवा केली. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी गावाकडे शीलाताईंच्या समवेत छान शेती फुलवली आणि वृक्ष संवर्धन करून निसर्गाचाही आनंद घेतला. करंजेकर परिवार अतिशय संयमी सुस्वभावी सेवाभावी परिवार म्हणून प्रसिद्ध आहे. कै. तानाजीराव करंजेकर साहेबांचे निधनाने त्यांच्या सर्व चाहत्यांना दुःख झाले. त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी त्यांचे सर्व नातेवाईक, सैनिक संघटना, विविध संस्थांचे पदाधिकारी, वायुदलातील व स्टेट बँकेतील सर्व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हीच त्यांच्या लोकप्रियतेची पावती आहे. मी आमच्या दैनिक युवावार्ता व हासे परिवाराच्यावतीने त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करतो व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

त्यांचा दशक्रियाविधी शुक्रवार दिनांक ८ मे २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता प्रवरा नदीचे तीरावर केशवतीर्थ येथे होईल असे त्यांच्या कुटुंबीयांनी कळविले आहे

**किसन भाऊ हासे**
**संगमनेर**

# अमेरिकेच्या घोषणेनंतर कच्च्या तेलात मोठी घसरण

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या ईरान-अमेरिका संघर्षात थांबण्याचे संकेत मिळू लागल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. अमेरिकेने 'ऑपरेशन एपिक फ्युरी' समाप्त करण्याचा आणि 'प्रोजेक्ट फ्रीडम' या नौदल मोहिमेला तात्पुरता स्थगिती देण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर गुंतवणूकदारांचा दृष्टिकोन बदलला आणि बाजारात विक्रीचा दबाव वाढला. याचा परिणाम म्हणून ब्रेंट क्रूडचे दर तब्बल ११ टक्क्यांनी घसरून ९७.०८ डॉलर प्रति बॅरलपर्यंत खाली आले, तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूडही १३.३१ टक्क्यांनी घसरून ८८.६६ डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचले.अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, इराणवर अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर ६६ दिवसांनी 'ऑपरेशन एपिक फ्युरी' यशस्वीरित्या पूर्ण झाले असून त्याचे उद्दिष्ट साध्य झाले आहे. त्यामुळे पुन्हा मोठ्या प्रमाणावर युद्ध भडकण्याची शक्यता कमी झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या माध्यमातून होर्मुज सामुद्रधुनीतून जहाजांना मार्ग काढून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना स्थगिती देण्याची घोषणा केली, मात्र नौदलाची नाकेबंदी सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. या घडामोडींमुळे बाजारात शांततेच्या अपेक्षा निर्माण झाल्या आणि कच्च्या तेलाच्या किमतीत नरमाईचा कल दिसू लागला.

# राज्याचे एआय धोरण, १.५ लाख नोकऱ्या

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र राज्याला देशाचे एआय हब' बनवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने बुधवारी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. २९ एप्रिल २०२६ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण-२०२६' चा शासन निर्णय निर्गमित केला.

या धोरणांतर्गत तांत्रिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी १.२५ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानाची तरतूद करण्यात आली असून आगामी पाच वर्षांत राज्यात १० हजार कोटींची गुंतवणूक आणि १.५ लाख रोजगारांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केवळ औद्योगिक प्रगतीच नव्हे, तर प्रशासकीय पारदर्शकता आणि मराठी भाषेचा डिजिटल विस्तार यावर या धोरणात विशेष भर देण्यात आला आहे.

राज्य सरकारने २०३०-३१ पर्यंत एआय क्षेत्रात १०,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. या गुंतवणुकीतून राज्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सुमारे १.५ लाख नवीन नोकऱ्या निर्माण होतील. विशेष म्हणजे केवळ नोकऱ्या निर्माण न करता त्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी महाराष्ट्र सेंटर फॉर डव्हान्स्ड एआय ट्रेनिंग' (एमसीएटी) मार्फत २ लाख व्यावसायिकांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. एकूणच याचा फायदा महिला उद्योजकांना होणार आहे.













# शाळा प्रवेशासाठी शिक्षकांची धडपड

## वाड्या-वस्त्यांवर जाऊन जनजागृती


छाया - विलास तुपे, राजूर

राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात शाळा प्रवेशासाठी शिक्षकांची मोठी धावपळ सुरू आहे. कडक उन्हाचा तडाखा सहन करत, शिक्षक मोटरसायकलवरून आदिवासी भागातील वाड्या-वस्त्यांवर जाऊन मुला-मुलींना शाळेत दाखल करण्यासाठी पालकांना समजावून सांगत आहेत.

दुर्गम भागात शिक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी शिक्षक प्रत्यक्ष घरोघरी भेट देत असून, शाळेत प्रवेश घेण्याचे महत्त्व पटवून देत आहेत. काही ठिकाणी भाषिक व सामाजिक अडचणी असूनही, शिक्षक संयमाने संवाद साधत पालकांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, सध्या ग्रामीण भागात वाळवणीचा हंगाम सुरू असल्याने महिलांची लगबग वाढली आहे. या पार्श्वभूमीवर महिला शिक्षिका देखील पुढाकार घेत, महिलांना कुरडई तयार करण्याच्या कामात मदत करताना दिसत आहेत. त्यामुळे शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपत, शिक्षक समाजाशी घट्ट नाते निर्माण करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शाळा प्रवेश मोहिमेला ग्रामस्थांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न सुरू आहेत.

# सावरगावतळ चाड्याचा डोंगर माथ्यावर वणवा पेटला




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तालुक्यातील वनसमृद्ध असलेल्या सावरगाव तळ हद्दीत तसेच झोळे परिसरातील चाड्याचा डोंगर, या सुमारे दोन हजार फूट उंचीच्या डोंगराच्या माथ्यावर वणवा भडकला आहे. यामुळे फार मोठ्या वनक्षेत्राची हानी होणार असल्याने पर्यावरणप्रेमींकडून हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संगमनेर तालुक्यातील बाळेश्वराचा डोंगर परिसरातील सावरगाव तळ या गावाने त्यांच्या शिवारातील वनक्षेत्राचे अत्यंत उत्तम पद्धतीने संगोपन केले आहे. यापूर्वी वेळोवेळी वनांच्या संवर्धनासाठी गावातील युवकांनी मदत केली असून, त्यांच्या सहकार्याने या परिसरात उत्तम वनक्षेत्र निर्माण झाले आहे. वट, पिंपळ, कडुलिंब आदी बहुवर्षायू वृक्षांसह इतरही अनेक प्रकारचे वृक्ष ग्रामस्थांनी अत्यंत आपुलकीने जपले आहेत.

काल बुधवारी या डोंगरावर रात्री साडेआठच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वणवा पेटल्याचे ग्रामस्थांनी पाहिले आहे. वणव्याची सुरुवात निमजच्या बाजूने झाल्याचे निरीक्षण ग्रामस्थांनी नोंदवले असून, हा वणवा डोंगर माथ्यावर गेल्यानंतर स्पष्टपणे दिसत आहे. कंबरेपेक्षा उंच आणि मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या वाळलेल्या गवतामुळे ही आग झपाट्याने पसरली आहे. रात्रीची वेळ, वाहणारे वारे तसेच डोंगराची उंची, आग विझवण्यासाठी आवश्यक असलेल्या पाणी व इतर साधनांची कमतरता, यामुळे या वणव्यावर नियंत्रण मिळवणे अवघड आहे. तसेच, या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर साबरीची झाडे असल्याने, या काटेरी वनांमध्ये रात्रीच्या वेळी घुसणे अशक्य आहे.

या भीषण आगीत मोठ्या प्रमाणावर वृक्षांसह सरपटणारे प्राणी व पशुपक्ष्यांची आहुती जाण्याची भीती पोलीस पाटील गोरक्षनाथ नेहे यांनी पुण्यनगरी प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. या वनक्षेत्रामध्ये २०१८ सालात लागलेला वणवा ग्रामस्थांनी आटोक्यात आणल्याची आठवणही पोलीस पाटलांनी सांगितली.

# माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे साईदर्शन



भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सहपरीवार श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से. यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे उपस्थित होते.


SUBSCRIBE OUR YOUTUBE
Daily Yuvavarta


# संगमनेर एमआयडीयीची कार्यवाही...

(पान नं. ०१ वरुन)

पान नं. ०१ वरुन-
लोकसभा मतदारसंघातील शिवसेने च्या संघटनात्मक बांधणीचा आढावा घेण्यात येणार असून, शिवसेना, महिला सेना, युवासेना आदी सर्व विभागांमध्ये गटप्रमुखापासून जिल्हा प्रमुखांपर्यंतची सर्व पदे भरलेली असावीत, यासाठी ही बैठक घेत ज

आहे तसेच अहिल्यानगर मधील दोन्ही लोकसभा मतदारसंघात शिवसेना पक्ष अधिक मजबूत व्हावा, यासाठी आपला प्रयत्न राहणार असल्याचा विश्वास त्यांनी माध्यमांशी बोलताना दिला

उद्योग विभागाला राज्य शासनाचा निधी मिळतो का, असा प्रश्न माध्यम प्रतिनिधी विचारला असता असता सामंत म्हणाले की, उद्योग विभाग हा औद्योगिक वसाहतींच्या माध्यमातून स्वतःचा निधी उभा करत असतो. त्यामुळे उद्योग विभागाला वेगळ्या निधीची आवश्यकता भासत नाही.

आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर विधानसभा मतदारसंघात औद्योगिक वसाहत उभी राहावी अशी मागणी आपणाकडे केली आहे त्यांची मागणी पूर्ण केली असून एम आयडीसी मंजूर झाली आहे, पुढील दोन महिन्यांत त्या संदर्भातील प्रत्यक्ष कार्यवाही सुरू होणार असल्याचे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले शिर्डी येथे एमआयडीसी उभारण्यात आली असून, माझ्या कार्यकाळात अनेक मोठे उद्योग तेथे आले आहेत. तसेच श्रीगोंदा, नेवासा आणि राज्यातील इतर अनेक मतदार संघांमध्ये नवीन एमआयडीसी दिल्या जात आहेत भविष्यात मुंबई, पुणे आणि नाशिकनंतर उद्योजकांनी अहिल्यानगरकडे आकर्षित व्हावे, यासाठी उद्योग विभाग विशेष प्रयत्न करत असल्याचेही सामंत यांनी नमूद केले.

सध्या मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याच्या घटनेबाबत विचारले असता, उदय सामंत म्हणाले की, अशी कृत्ये करणारी प्रवृत्ती अत्यंत नीच असून, पोलीस प्रशासनाने अशा प्रवृत्तीला कायमची आळा घातला पाहिजे.

भविष्यात जिल्ह्यात, राज्यातच नव्हे तर देशात कुणीही अशा प्रकारचे कृत्य करण्याचे धाडस करू नये, अशी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी आमची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस प्रशासन कायद्याची अंमलबजावणी करत असले तरी आणखी कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

शक्ती कायद्याला शिवसेनेचा पाठिंबा

शक्ती कायद्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार ठेहळीं झरुरी यांनी केलेल्या मागणीवर बोलताना सामंत म्हणाले की, शक्ती कायद्याला विधानसभेने एकमताने मंजुरी दिली आहे.

शिवसेना शक्ती कायद्याच्या विरोधात नसून, हा कायदा लागू झाला पाहिजे, या भूमिकेवर ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे आणि आम्ही सर्वजण शक्ती कायदा लागू करण्यासाठी पाठपुरावा करत आहोत, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.


**ग्रामपंचायत खानापूर, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर**

**जाहिर निविदा अंतर्गत खुली निविदा सुचना १**

सरपंच ग्रामपंचायत खानापूर, ता. शेवगाव जि. अ. नगर योग्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने खालील कामांच्या निविदा मागविन्यात येत आहे. निविदा कोरा नमूना संच वाटप व भरलेली निविदा स्विकारण्याचा कालावधी दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. १४/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत

**योजना- १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६**

| अ. क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम रु. | बयाना रक्कम | काम पुर्ण करावयाची मुदत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे खानापूर येथे पा. पु. विहिरीजवळ भराव व मजबुतीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | १३९९५५/- | १३९९/- | ०६ महिने | खुला |

**- कोऱ्या निविदा संचाची किंमत ही २३६/- असेल**

१. उपरोक्त विषयान्वये निविदा अटी व शर्त इ. बाबत सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असुन कोऱ्या निविदा संच दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि. १४/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे पहावयास मिळेल. २. बयाना रक्कम ही धनाकर्ष सरपंच ग्रामपंचायत खानापूर यांच्या नावाने असणे अभिप्रेत आहे. ३. उपरोक्त कामाची दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११ वा. ते दि १४/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५ वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल ४. निविदा दि. १५/०५/२०२५ रोजी सकाळी ११ वा. ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे उघडण्यात येतील. ५. निविदा या बयाना लिफाफा, तांत्रिक लिफाफा या पद्धतीच्या सादर करावयाच्या आहेत. ६. निविदा अटी व शर्तिमध्ये बदल करणे, प्राप्त निविंदापैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारन्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी राखून ठेवलेला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत खानापूर, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर**


# अमृतवाहिनी बी फार्मसी महाविद्यालयात नक्षत्र २०२६ सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात



संगमनेर
(प्रतिनिधी)-
अभ्यासाच्या धकाधकीतून थोडासा विरंगुळा आणि व्यक्तिमत्व विकासाकरता अमृतवाहिनी बी फार्मसी महाविद्यालयात नक्षत्र २०२६ या झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात देशातील विविध संस्कृतींचा सुरेख मिलाफ पाहायला मिळाला असून, विद्यार्थ्यांच्या जीवनात हा मोठा अनमोल ठेवा ठरला आहे.

अमृतवाहिनी बी फार्मसी महाविद्यालयात नक्षत्र २०२६ ची सुरुवात ट्रॅडिशनल डे ने झाली. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक वेशभूषा केली. याचबरोबर बॉलीवूड आणि हॉलीवूड डे सुद्धा साजरा करण्यात आला. यामध्ये आवडत्या चित्रपटातील कलाकारांचे वेशभूषा व केशभूषा विशेष आकर्षण ठरल्या, तर स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये अहिराणी नृत्य, गोंधळी नृत्य, फ्युजन साँग, सोलो साँग, लावणी, मराठी गाणे यांनी धमाका उडवून दिला. सुंदर आयोजन, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग, आकर्षक वेशभूषा, लाईट डेकोरेशन आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असलेला महोत्सव हा विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय अनुभव ठरला.

यावेळी बोलताना शरयू देशमुख म्हणाल्या की, महाविद्यालयीन जीवन हे अत्यंत महत्त्वाचे असते. या कालावधीमध्ये तुमच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू पडतात. अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये जे विविध गुण असतात, त्यांना व्यासपीठ निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. मेडिकल क्षेत्रामध्ये असणारे हे विद्यार्थी नक्षत्र २०२६ कायम स्मरणात ठेवतील, अशा त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मच्छिंद्र चव्हाण यांनी केले.

कलाविष्कारातील उत्कृष्ट सहभागाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. जे. चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

# संगमनेरचे युवा नेतृत्व

## आमदार अमोल खताळ पाटील

राजकारणात अनेक चेहरे येतात, अनेक घोषणा होतात, अनेक आश्वासने दिली जातात; पण जनतेच्या मनात कायमचे स्थान निर्माण करणारे नेते फार कमी असतात. कारण नेतृत्व हे पदाने मोठे होत नसते, तर ते जनतेच्या प्रेमाने, विश्वासाने आणि केलेल्या कामाने घडत असते. संघर्ष, संयम, सातत्य, स्वाभिमान आणि सर्वसामान्य माणसासाठी झटण्याची तळमळ या गुणांनी एखादा नेता लोकांच्या हृदयात घर करतो. संगमनेर तालुक्याला लाभलेले आमदार अमोलभाऊ खताळ पाटील हे असेच एक विकासाभिमानी, शांत, संयमी आणि जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे नेतृत्व आहे.



संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अमोलभाऊंनी संघर्षातून स्वतःचा प्रवास घडवला. कोणताही राजकीय वारसा नसताना, केवळ मेहनत, जिद्द आणि लोकांशी जोडलेली नाळ यांच्या बळावर त्यांनी जनतेच्या मनात आपली वेगळी ओळख निर्माण केली. शालेय जीवनापासूनच मित्रांसाठी, समाजासाठी धावून जाण्याची त्यांची वृत्ती होती. समाजातील गोरगरीब, कष्टकरी, कामगार, निराधार आणि वंचित घटकांसाठी त्यांनी सातत्याने काम केले. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केलेले कामच त्यांची खरी ताकद ठरली.

सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत संगमनेरच्या जनतेने परिवर्तनाचा निर्णय घेतला आणि एका सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला भरघोस मतांनी विजयी करून इतिहास घडवला. अत्यंत कमी वेळात, प्रचंड आव्हानांचा सामना करत, गावोगावी आणि वाड्या-वस्त्यांवर जाऊन त्यांनी जनतेशी थेट संवाद साधला. त्यांच्या साधेपणाने, प्रामाणिकपणाने आणि काम करण्याच्या वृत्तीने प्रत्येक मतदार त्यांच्याशी जोडला गेला. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नव्हता, तर तो सर्वसामान्य जनतेच्या स्वाभिमानाचा विजय होता.

आज आमदार म्हणून काम करताना अमोलभाऊंनी विकासालाच आपले ध्येय मानले आहे. तालुक्यातील दुष्काळी भागात पाणी पोहोचवणे, रस्ते, शिक्षण, आरोग्य, शेती आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि सुमित्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी संगमनेरसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणून विकासकामांना गती दिली आहे.

गेल्या काही महिन्यांत सुरू झालेली विकासकामे ही येणाऱ्या परिवर्तनाची केवळ सुरुवात आहे. जनतेच्या प्रत्येक प्रश्नासाठी दिवस-रात्र उपलब्ध राहणारा आमदार म्हणून अमोलभाऊंची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या शांत स्वभावात ठामपणा आहे, संयमात ताकद आहे आणि स्वाभिमानात जनतेसाठी लढण्याची जिद्द आहे.

आज संगमनेर तालुक्याला विकासाची नवी दिशा देणारा, सर्वसामान्य माणसाच्या हक्कासाठी झटणारा आणि जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणारा नेता लाभला आहे, हे तालुक्याचे खरे भाग्य आहे. आणि म्हणूनच, आज संगमनेरच्या जनतेच्या मनातून एकच आवाज घुमतो - आता थांबायचं नाय!

अशा या दिलदार, जनतेच्या मनातील जिगर मित्र आमदार अमोलभाऊ खताळ पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या हातून संगमनेरचा विकास अधिक वेगाने घडत राहो, सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांना नवी दिशा मिळो आणि संगमनेर महाराष्ट्रात आदर्श तालुका म्हणून ओळखला जावो, हीच श्रीचरणी प्रार्थना.

**- राहुल सोमवंशी (जहागिरदार)**
**अमोलभाऊ खताळ मित्र परिवार, संगमनेर**

# संपादकीय...

## हिंसक राजकारण धोकादायक

लोकशाही ही संवाद, मतभिन्नता, सहिष्णुता आणि जनतेच्या विश्वासावर उभी असते. निवडणूक ही लोकशाहीची सर्वात मोठी आणि महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. जनतेने आपला प्रतिनिधी निवडण्यासाठी शांततेत मतदान करणे आणि निकाल स्वीकारणे, ही लोकशाहीची खरी ताकद असते. मात्र गेल्या काही वर्षांत निवडणुकांदरम्यान वाढत चाललेला हिंसाचार भारतीय लोकशाहीसाठी गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. निवडणुका आणि हिंसा हे आपल्या देशाला नवीन नाही. ग्रामपंचायतीपासून विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांपर्यंत अनेक ठिकाणी राजकीय संघर्ष हिंसक वळण घेताना दिसतो. विशेषतः उत्तर भारतीय हिंदी भाषिक पट्ट्यातील काही राज्यांमध्ये निवडणूक आणि हिंसा हे जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या आहेत. महाराष्ट्रात तुलनेने परिस्थिती चांगली असली, तरी देशातील अनेक राज्यांमध्ये निवडणुकीच्या आधी, मतदानाच्या दिवशी किंवा निकालानंतर मोठ्या प्रमाणावर दंगल, जाळपोळ, मारामाऱ्या आणि हत्यांच्या घटना घडताना दिसतात. पश्चिम बंगालमध्ये नुकत्याच घडलेल्या हिंसाचाराने पुन्हा एकदा लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होताच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष उफाळून आला. अनेक ठिकाणी मारामाऱ्या, तोडफोड, जाळपोळ आणि गोळीबाराच्या घटना घडल्या. या हिंसाचारात अनेक कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला, तर शेकडो लोक जखमी झाले. भाजपचे वरिष्ठ नेते सुवेंदु अधिकारी यांच्या निकटवर्तीयांची हत्या झाली, तर दुसरीकडे तृणमूल काँग्रेसनेही विरोधकांवर गंभीर आरोप केले. हिंसाचारानंतर पोलिसांनी शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले, तरी परिस्थिती तणावपूर्णच राहिली. हे चित्र अत्यंत धोकादायक आहे. कारण लोकशाहीत मतभेद असू शकतात, पण हिंसेला स्थान असू शकत नाही. राजकीय पक्षांनी विचारांच्या लढाईऐवजी रस्त्यावर संघर्ष सुरू केला, तर लोकशाहीचा आत्माच नष्ट होतो. निवडणूक म्हणजे विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होणे, जनतेच्या समस्यांवर उपाय मांडणे आणि लोकांनी योग्य प्रतिनिधी निवडणे; परंतु आज अनेक ठिकाणी निवडणुका म्हणजे शक्तिप्रदर्शन, धमक्या आणि हिंसाचाराचे मैदान बनत चालल्या आहेत. यामागे राजकीय द्वेष, सत्तेची लालसा आणि कार्यकर्त्यांमध्ये वाढत चाललेली असहिष्णुता हे प्रमुख कारण आहे. अनेकदा राजकीय नेत्यांच्या आक्रमक भाषणांमुळे कार्यकर्ते भडकतात आणि वातावरण तणावपूर्ण बनते. सोशल मीडियामुळेही द्वेषाचे राजकारण अधिक तीव्र झाले आहे. अफवा, खोट्या बातम्या, भडक संदेश आणि विरोधकांबद्दलचा अपमानास्पद प्रचार यामुळे समाजात वैमनस्य वाढत आहे. निवडणुकीनंतरही पराभव स्वीकारण्याची मानसिकता कमी होत चालली आहे. लोकशाहीत विजय आणि पराभव हे दोन्ही तितकेच महत्त्वाचे असतात. पराभव स्वीकारून पुन्हा जनतेत जाणे, हा लोकशाहीचा मार्ग आहे; पण आज पराभवानंतर हिंसा घडवून सूड उगवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ही प्रवृत्ती भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. निवडणुकीतील हिंसाचाराचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. सर्वसामान्य माणूस भीतीच्या वातावरणात जगतो. अनेक ठिकाणी मतदानासाठी लोक बाहेर पडण्यास घाबरतात. महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते, दुकाने जाळली जातात, वाहने फोडली जातात आणि समाजात दीर्घकाळ तणाव निर्माण होतो. यामुळे लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास कमी होण्याचा धोका असतो. राजकीय पक्षांनी हे समजून घेतले पाहिजे की सत्ता ही कायमस्वरूपी नसते, पण समाजातील शांतता आणि लोकशाहीवरील विश्वास कायम राहणे अत्यंत आवश्यक आहे. निवडणूक आयोगाची भूमिकाही या संदर्भात महत्त्वाची ठरते. निवडणूक काळात केवळ मतदान प्रक्रिया पार पाडणे एवढीच आयोगाची जबाबदारी नसून शांततापूर्ण वातावरण राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. हिंसाचार घडवणाऱ्या पक्षांवर आणि नेत्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. भडकाऊ भाषणे करणाऱ्या नेत्यांना निवडणूक लढवण्यास बंदी, कार्यकर्त्यांवर कठोर गुन्हे, संवेदनशील भागांत अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आणि सोशल मीडियावर नियंत्रण यांसारखी पावले उचलावी लागतील.


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची


# जयहिंदच्या माध्यमातून विज्ञाननिष्ठ पिढी घडेल - डॉ. तांबे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

निरोगी आणि सुदृढ समाजनिर्मितीसाठी कार्यरत असलेल्या 'जयहिंद लोकचळवळ'च्या माध्यमातून सक्षम देश निर्माण व्हावा, याकरता विज्ञाननिष्ठ पिढी घडवण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे. मॉडेल स्कूलमध्ये पाचदिवसीय निवासी युवा सर्वांगीण विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, ११ ते १६ वयोगटातील १०० विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जात आहे. आजपासून सुरू झालेले हे शिबिर पुढील पाच दिवस चालणार आहे.



या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थी एकलकोंडे होत आहेत. खरे तर मुलांनी मैदानाकडे वळले पाहिजे, कारण आरोग्य आणि मानसिकता याकरता व्यायाम महत्त्वाचा आहे. सध्या स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेमध्ये टिकून राहण्याकरता सक्षम आणि कणखर मानसिकता महत्त्वाची आहे. यश आणि अपयश पचवण्याबरोबर विद्यार्थ्यांमधील व्यक्तिमत्व विकासाला चालना देण्यासाठी जय हिंदचे हे पाच दिवसीय शिबिर असल्याचे ते म्हणाले.

या शिबिरात विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचार, शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. बदलत्या युगाशी सुसंगत राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. नृत्य, खेळ, योग, ध्यान, वाचन, संवाद कौशल्य आदींचा शिबिरात समावेश करण्यात आल्याची माहिती शिबिराचे प्रमुख अनंत शिंदे यांनी दिली. या शिबिरात श्री. बजरंग जेडगुले, प्रा. नानासाहेब दिघे, वैभवी प्रेमलता संजय आढाव, प्रा. कोमल मस्के, धनश्री टाकळकर, दिपाली गायके, समाधान जाधव, तेजस पवार, अशा नामांकित प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जात आहे.

संगमनेर तालुक्यातील १०० विद्यार्थ्यांना शिबिराद्वारे सहासी खेळ, योगा, छायाचित्रण, घोडेस्वारी, मातीकाम, रायफल शूटिंग, व्यायाम, स्काऊट गाईड, प्रथमोपचार, लेझीम, नृत्य, झांजरी, पथनाट्य, अंधश्रद्धा निर्मूलन, ट्रेकिंग, संगीत, संस्कार आणि अभिनय यांसारख्या विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे. दररोज सकाळी सात ते रात्री नऊ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांत सहभागी करून घेतले जाते.

शिबिरात विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकायला मिळत असल्याने त्यांच्यात उत्साहाचे वातावरण आहे. राष्ट्रपुरुषांच्या जीवनावरील प्रेरणादायी व्याख्याने व देशभक्तिपर गीतांमुळे सहभागी विद्यार्थी आनंदाने शिबिराचा लाभ घेत असून, त्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासाला चालना मिळत आहे.

# ग्रामीण भागातील तरुणांसाठी मार्गदर्शक बना -आ खताळ

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

बिरेवाडीसारख्या अत्यंत ग्रामीण भागातील संतोष सागर यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. त्यांच्या या यशाबद्दल आमदार अमोल खताळ यांनी त्यांचे कौतुक करत, ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले. तसेच, संतोष सागर यांनी याच पदावर न थांबता पुढील स्पर्धा परीक्षा देत उच्च पदावर झेप घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.



संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील साकुरजवळील बिरेवाडी (ता. संगमनेर) येथील सुपुत्र संतोष शारदा सूर्यभान सागर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल धांदरफळ खुर्द येथील संपत खताळ परिवाराच्या वतीने सासरवाडीत त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी व्यासपीठावर सत्कारमूर्ती संतोष सागर यांची पत्नी प्रणिती सागर, आई शारदा सागर, सासरे संपत खताळ, अर्जुन महाराज खताळ, भाजप तालुका अध्यक्ष गुलाबराजे भोसले, शिवसेना उपतालुकाप्रमुख बादशाह गुंजाळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, सध्या राज्यात महायुती सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शासकीय नोकरभरती सुरू आहे आणि ही युवकांसाठी सुवर्णसंधी आहे. राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली भरती प्रक्रियेला वेग आला असून, ग्रामीण भागातील तरुणांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आज मला मिळालेले यश हे केवळ माझे नसून, माझ्या कुटुंबाच्या पाठबळाचे फळ आहे. त्यांच्या विश्वास, त्याग आणि सततच्या प्रोत्साहनामुळेच मी या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलो. माझी निवड झाल्यानंतर सर्वप्रथम माझा सन्मान सासरवाडीत झाला, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि भावनिक गोष्ट आहे. अशी साथ देणारी सासरवाडी मिळणे, हे खरोखर भाग्याची बाब आहे. या सन्मानामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून, पुढील काळात आणखी मोठ्या पदावर पोहोचण्यासाठी मी निश्चितच प्रयत्नशील राहीन.

- संतोष सागर (पोलीस उपनिरीक्षक)


SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta


## ग्रामपंचायत पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, खुली निविदा नोटीस

ग्रामपंचायत ग्रामपंचायत पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचेमार्फत योग्य त्या जिल्हा परिषद ठेकेदार अंतर्गत नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा / दरपत्रक मागवित आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.०८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून ते दि. १२/०५/२०२६ सायंकाळी कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच शासकिय सुट्टी वगळून व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत १३/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा नंतर निविदा उघडण्यात येतील.

| अ.क्रं. | कामाचे नाव | योजना | प्रशासकीय रक्कम | बयाणा रक्कम | काम पुर्ण करण्याची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे पळसुंदे दुटेवाडी येथे पाईपलाईन विस्तारीकरण करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२३-२४ | २१८३३३/- | २१८३/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |
| २ | मौजे फोफसंडी येथे पंपहाऊस दुरुस्त करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२२-२३ | २३२०४७/- | २३२०/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |
| ३. | मौजे पळसुंदे येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | १९३०८२/- | १९३०/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |
| ४. | मौजे घोडेवाडी येथे स्मशानभूमी बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२३-२४ | २८८८९७/- | २८८८/- | तीन महिने | १००/- | सु.बे. |

अटी व शर्ती - १) सदर काम पूर्ण करणेच कालावधी ३ महिने राहील २) निविदा / दरपत्रक या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. ३) निविदा / दरपत्रक अटि व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ४) लिफाफा क्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

**सरपंच**
**ग्रा.पं. पळसुंदे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर**


# जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

गाळे भाडेतत्वावर देणे आहे
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट
पत्ता - नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

पाहिजेत
वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे
अकौंटंट - ०२ जागा पात्रता - बी.कॉम/ एम. कॉम
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२ जागा, पात्रता - बी. कॉम
एल.एम. व्ही. वाहन चालक - ०३ जागा, अनुभवी
वॉचमन - ०३ जागा
पत्ता- डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
संपर्क - 9370071777 9518556933, 9822791484

ड्रायव्हर पाहिजे
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

पाहिजेत
सरस्वती अॅग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे
टेलीकॉलिंग 10 जागा
फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
प्रोडक्शन लाइन 10 जागा
पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
Dispatch सुपरवाइझर 02 जागा
(कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य)
ड्रायवर - पगार- १५ हजार 05 जागा
(ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)
अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00
सरस्वती अॅग्रो इंडस्ट्रीज
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

भाड्याने देणे आहे
रुम भाड्याने देणे आहे
२०० स्क्वे.फुट सर्व सुविधांयुक्त
पत्ता- शिवाजी नगर गल्ली, नं.१, संगमनेर
९४०४९१७९१२
९४०३१५४०१७

पाहिजेत
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १
जाहिरात व्यवस्थापक - १
डिझायनर - १
वितरण व्यवस्थापक - १
टेलिकॉलर - १
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला
१२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

ड्रायव्हर पाहिजे
गिअर आणि ऑटोमॅटिक कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
श्री गुलाब आर्च
संपर्क - नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

पाहिजेत
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट - १ जागा (बी. कॉम/ टॅली)- पुरुष
सेल्समन - १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार - १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण - बारावी व त्यापुढील
8999862759

पाहिजेत
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देत नाही, याची नोंद घ्यावी






# सुवेंदू अधिकारी यांच्या पीए ची गोळ्या झाडून हत्या, २ गोळ्या छातीच्या आरपार

उत्तर परगणा (वार्ताहर)-

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम येथे बुधवारी रात्री १०:३० वाजता भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे वैयक्तिक सहाय्यक (पीए) चंद्रनाथ रथ (४२) यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. घटनेच्या वेळी चंद्रनाथ स्कॉर्पिओ गाडीतून कोलकाताहून मध्यमग्राममधील आपल्या घरी परतत होते.



मिळालेल्या माहितीनुसार, ते चालक आणि आणखी एका व्यक्तीच्या शेजारी बसले होते. कोलकातापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या दोलतला आणि मध्यमग्रामच्या दरम्यान, मागून आलेल्या एका कारने स्कॉर्पिओचा रस्ता अडवला.

त्यानंतर हल्लेखोर मोटारसायकलवरून आला आणि त्याने स्कॉर्पिओच्या डाव्या बाजूने सहा ते दहा गोळ्या झाडल्या. चंद्रनाथ यांना चार गोळ्या लागल्या, त्यापैकी दोन त्यांच्या छातीत आणि एक पोटात घुसली. चालक बुद्धदेव बेरा यांनाही गोळी लागली.

घटनेनंतर हल्लेखोरांनी गाडी सोडून मोटारसायकलवरून पळ काढला. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी चंद्रनाथ यांना मृत घोषित केले. चालकाची प्रकृती गंभीर आहे. भाजपने ही घटना घडवल्याचा आरोप टीएमसीवर केला आहे.

# बेकायदा गर्भलिंग गुन्ह्यात आणखी एक डॉक्टरसह दोघे गजाआड

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ शिवारात सुरू असलेल्या एका मोठ्या बेकायदा गर्भलिंग निदान रॅकेटचा अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी पर्दाफाश केला होता. या कारवाईत दोन डॉक्टर आणि मुख्य एजंटसह एकूण पाच जणांना आतापर्यंत अटक करण्यात आली असून, पोलिसांनी २४ लाख ९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

२९ एप्रिल २०२६ रोजी निळवंडे कालव्याशेजारील एका खोलीत महिलांकडून १० हजार रुपये घेऊन बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान चाचणी केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे लोणी पोलीस आणि वैद्यकीय पथकाने संयुक्तरीत्या सापळा रचून धाड टाकली असता, घटनास्थळावरून डॉ.



राहुल भनगे आणि अभिजीत भुसाळ या मुख्य आरोपींना ताब्यात घेण्यात आले. या धाडीमध्ये पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, ४ मोबाईल फोन, ५९ हजार रुपये रोख आणि गुन्ह्यासाठी वापरण्यात आलेल्या स्विफ्ट, एर्टिगा व वॅगनआर अशा तीन आलिशान कार जप्त करण्यात आल्या होत्या.

प्राथमिक अटकेनंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपासाची व्याप्ती वाढवली असता, गर्भवती महिला आणि डॉक्टरांमध्ये समन्वय साधणाऱ्या मोठ्या रॅकेटचा खुलासा झाला. या तपासात प्रदीप ढगे आणि निलेश भवर या दोन एजंटचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांनाही पोलिसांनी शिताफीने अटक केली. या आरोपींच्या सखोल चौकशीतून श्रीरामपूर येथील डॉ. रविंद्र कुटे यांचे नाव समोर आले असून, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्यांनाही या गुन्ह्यात अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या रॅकेटचे धागेदोरे पुण्यातील काही डॉक्टरांपर्यंत पोहोचले असून, अटक करण्यात आलेला एजंट प्रदीप ढगे याच्याकडून लिंग निदानासाठी वापरले जाणारे आणखी एक मशीन जप्त करण्यात आले आहे. या गुन्ह्यात आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची दाट शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. दरम्यान, नव्याने अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना आज राहाता न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आशिष चौधरी, पोलीस हवालदार दादासाहेब लोढे, संदीप दरंदले, अशोक गाडे, राजेंद्र बिरदवडे, असिर सय्यद, साईनाथ राशिनकर, सचिन शेवाळे, श्री. भोईटे, मनिषा गिरी यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच डॉक्टर, एजंट आणि दलाल यांच्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर एकत्रित कारवाई करण्यात आल्याने खळबळ उडाली असून, पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (जिल्हा माहिती कार्यालय)-

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या जायका या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून, ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यापूर्वी आसाम आणि तामिळनाडूसारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर जायका आता महाराष्ट्रातही 'मेडिकल केअर सिस्टीम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. सध्याच्या शासकीय वैद्यकीय,



पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे, विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे, नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे, आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य. राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगाव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलिव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम अँड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत रुग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृद्धीसाठी तरतूद करण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल. त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

## विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीनिमित्त

# लोकशाहीर संभाजी भगत यांचा पुरोगामी संघटनांकडून सत्कार



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

१५ व्या विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल लोकशाहीर संभाजी भगत यांचा संगमनेर येथे पुरोगामी, समतावादी व आंबेडकरवादी विविध संघटनांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. आपल्या शाहिरीच्या माध्यमातून संविधान व समतेचा प्रचार करणाऱ्या संभाजी भगत यांच्या अध्यक्षपदी निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

या प्रसंगी जोर्वे जिल्हा परिषद गटाचे नेते शरद नाना थोरात, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पँथर माणिकराव यादव, राजहंस दूध संघाचे एमडी खिलारी, अ. नगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बंटी यादव, ज्येष्ठ साहित्यिक के. जी. भालेराव, विनोद गायकवाड, थोरात सर, निवेदक रामदास काकड, मच्छिंद्र भोसले, राहुल भोसले आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना लोकशाहीर संभाजी भगत म्हणाले, ही निवड माझी नसून विद्रोही विचारांची आहे. शाहिरी हे माझ्यासाठी शस्त्र आहे आणि त्या शस्त्राने मी संविधान, समता आणि बंधुतेचा लढा अधिक तीव्र करेन.

सातारा येथे होणाऱ्या १५ व्या विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनात बहुजनांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शाहिरीच्या माध्यमातून संविधानाचा लढा अधिक तीव्र करणार.

# सेंद्रिय शेतीची हाक - आता जागे होण्याची वेळ आली आहे

कळते पण वळत नाही, ही म्हण आजच्या आपल्या जीवनशैलीचे अत्यंत अचूक चित्रण करते. आपल्याला सर्व काही माहित आहे. तंबाखूचे दुष्परिणाम माहित आहेत, रासायनिक शेतीमुळे अन्नात येणारे विष माहित आहे, संकरीत अन्नपदार्थ आणि कृत्रिम पद्धतींचे परिणाम माहित आहेत. तरीही आपण त्याच मार्गावर चालत आहोत, कदाचित सोयीसाठी, कदाचित तात्पुरत्या फायद्यासाठी, किंवा कदाचित बदलाची भीती वाटत असल्यामुळे. आपण स्वतःच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याशी खेळत आहोत का? आज ग्रामीण आणि शहरी दोन्ही समाजात काही चिंताजनक प्रवृत्ती दिसत आहेत. बिडी, सिगारेट, तंबाखू, गुटका यांचे वाढते व्यसन, रासायनिक खते, तणनाशके आणि कीटकनाशकांचा अतिरेकी वापर, कार्बाईडने पिकवलेली फळे, स्टेरॉइडयुक्त दूध आणि भाज्या. हे सर्व फक्त उत्पादन वाढवण्यासाठी किंवा तात्पुरता नफा मिळवण्यासाठी केले जात आहे. पण याचा परिणाम- वाढते कर्करोग, डायबिटीज, ब्लडप्रेशर, कमी होत चाललेली प्रतिकारशक्ती, पुढील पिढ्यांवर होणारे गंभीर परिणाम, हा आपण दुर्लक्ष करू शकत नाही.



कर्करोग - केवळ आकडा नाही, तर प्रत्येक घराची वेदना. आज कर्करोग ही केवळ एक वैद्यकीय समस्या राहिलेली नाही, तर ती सामाजिक, आर्थिक आणि मानसिक संकट बनली आहे. अनेक कुटुंबांमध्ये- आई-वडिलांचे आजारपण, उपचारांचा प्रचंड खर्च, कुटुंबाच्या अर्थकारणावर होणारा ताण, मानसिक खच, हे सर्व आपण अनुभवत आहोत. तंबाखू हा मोठा कारणीभूत घटक आहेच, पण त्याचबरोबर- रासायनिक अन्न, विषारी अवशेष, असंतुलित जीवनशैली, यांचा एकत्रित परिणाम परिस्थिती अधिक गंभीर बनवत आहे. आपण प्रगती करतोय की स्वतःलाच हानी पोहोचवतोय? जास्त उत्पादनाच्या हव्यासापोटी आपण पारंपरिक देशी गोपालन सोडले, संकरीत पशुपालन आणि कृत्रिम पद्धती स्वीकारल्या, तात्पुरत्या नफ्यासाठी दीर्घकालीन आरोग्य धोक्यात घातले. पण थांबून विचार करण्याची वेळ आली आहे. औषधोपचाराचा खर्च वजा केल्यावर हा व्यवसाय खरोखर फायदेशीर आहे का? आपल्या कुटुंबाचे आरोग्य धोक्यात घालून मिळवलेला पैसा कितपत उपयोगाचा आहे?

सेंद्रिय शेती - एक पर्याय नाही, तर आवश्यकता. आजच्या परिस्थितीत सेंद्रिय शेती ही केवळ एक ट्रेंड नसून ती काळाची गरज बनली आहे. काय बदल आवश्यक आहेत? तंबाखू आणि गुटका यांना ठाम नकार द्या, रासायनिक शेतीपासून सेंद्रिय शेतीकडे वळा, तणनाशक आणि अतिविषारी औषधांचा वापर थांबवा, शुद्ध आणि सुरक्षित अन्ननिर्मितीला प्राधान्य द्या. देशी गोपालन - आरोग्य आणि अर्थकारणाचा पाया. देशी गायी आणि म्हशींचे पालन हे केवळ परंपरा नाही, तर एक संपूर्ण जीवनपद्धती आहे. एका देशी गायीमुळे संपूर्ण कुटुंबाचे पोषण आणि आरोग्य जपले जाते, शेण आणि गोमूत्रामुळे शेतीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होतो, २-३ एकर जमीन सेंद्रिय पद्धतीने सहज समृद्ध करता येते.

अनुभवातून सिद्ध झालेले परिणाम. गेल्या काही वर्षांत सेंद्रिय शेतीचे प्रयोग आणि अनुभव सांगतात- कमी खर्चात चांगले उत्पादन शक्य आहे, कमी पाण्यातही शेती यशस्वी होऊ शकते, जमिनीची सुपीकता आणि गुणवत्ता टिकून राहते. म्हणजेच, सेंद्रिय शेती ही केवळ आदर्श नाही-ती व्यवहार्य आणि फायदेशीर आहे. आपली सामाजिक जबाबदारी. हा बदल केवळ वैयक्तिक पातळीवर न राहता सामाजिक चळवळ बनणे गरजेचे आहे. प्रत्येकाने काही लोकांना व्यसनमुक्त करण्याचा संकल्प करावा, शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि आवश्यक तेथे आर्थिक मदत करावी, सेंद्रिय शेती प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करावे, गावोगावी समाजजागृतीचे कार्य चालू ठेवावे. अंतिम आवाहन. निसर्गाचा एक सोपा नियम आहे- जे पेराल, तेच उगवेल. आज आपण जर विष पेरत असू, तर उद्या त्याचे परिणामही तस्सेच भोगावे लागतील. मोजके उत्पादन चालेल, पण निरोगी जीवन महत्त्वाचे आहे. पुढील पिढी सुरक्षित ठेवायची असेल, तर आजच निर्णय घ्या. व्यसनमुक्त समाज, सेंद्रिय शेती आणि देशी गोपालन यात्रिसूत्रीचा वापर हीच खरी प्रगतीची दिशा.

**अरविंद औताडे, मुंबई**
**मोबा. ९८२१३५५४९०**
**शाश्वत शेती आणि युवा ऊद्योजगता मंच, सोलफ्रेश ॲग्रोटेक, शिवाजीनगर, पुणे**

# विरोधी पक्षनेत्याची बदनामी, गुन्हा दाखल

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सोशल मीडियावर कोणत्या ना कोणत्या कारणासाठी व्यक्तिगत मत, टीका-टिप्पणी सातत्याने होत असतात. हल्ली सोशल मीडियावरील मत-मतांतरे यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, या व्यक्तिगत विचार आणि मतप्रदर्शनाने तक्रारी आणि गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण देखील वाढले आहे. अशाच एका प्रकरणात, सोशल मीडियावर देशाचे विरोधीपक्षनेते राहुल गांधी



यांच्याबाबत आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी श्याम तिवारी यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील 'सौ. शहरी एक संगमनेरी' या व्हॉट्सॲप समूहात काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे बाबरांचे वंशज असल्याची वादग्रस्त टिप्पणी केल्याप्रकरणी शाम तिवारी (रा. देवाचा मळा) यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रकाश तुकाराम कडलग, शिवाजीनगर यांनी शहर पोलिसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत.

# कर्जत - जामखेड तालुक्यात अखंडित वीज पुरवठ्यासाठी उपाय योजना राबवा – सभापती शिंदे

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

कर्जत-जामखेड तालुक्यातील नागरिकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा, यासाठी तातडीने परिणामकारक उपाययोजना अंमलात आणाव्यात, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.



शासकीय विश्रामगृहात वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत तालुक्यातील वीज पुरवठ्याबाबत आढावा बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस अधीक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता कौस्तुभ डबीर, उपकार्यकारी अभियंता प्रवीण वारे व प्रदीप कटकधोंड यांच्यासह कर्जत-जामखेड येथील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

प्रा. शिंदे म्हणाले की, कर्जत-जामखेड परिसरात वारंवार वीज खंडित होणे, अनियमित लोडशेडिंग तसेच तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याचा थेट परिणाम शेतकरी, लघुउद्योजक, व्यापारी तसेच सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर होत असून, वीज पुरवठा व्यवस्थेत तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे. विशेषतः सायंकाळी ६ ते १० या कालावधीत वीज पुरवठा अखंडित राहावा, यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

वीज वितरण कंपनीने ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविणे, जुन्या वीजवाहिन्यांचे नूतनीकरण करणे तसेच तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे. तसेच, नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करून सेवा अधिक पारदर्शक व परिणामकारक करावी, असेही त्यांनी नमूद केले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढत असल्याने संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून नियोजनबद्ध काम करावे. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करावी, असे निर्देशही प्रा. शिंदे यांनी दिले.







# !! जनसेवेचा महामेरू !!

# लोकमान्य नेतृत्व आ. अमोलभाऊ खताळ



संगमनेरच्या विकासाची नवी पहाट, अन्यायाविरुद्ध पेटलेली मशाल आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारे लोकनेते आमदार अमोलभाऊ खताळ पाटील यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!

**विकासाचा 'अमोल' पॅटर्न...**

**भिजत पडलेल्या प्रश्नांना न्याय :** ४० वर्षांची मक्तेदारी मोडीत काढत, तळेगाव-साकुर पाणी प्रश्नाकडे लक्ष घालून निळवंडे आणि भोजापूर चारी कालव्याची कामे पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील साहेब आणि डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णत्वास नेऊन, संगमनेर तालुक्यातील तळेगाव भागातील कोरडवाहू जमिनीला सुजलाम सुफलाम करणारे भागीरथ!

**महिला अन् ज्येष्ठांसाठी योगदान :** ४० हजार लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळवून दिला. संजय गांधी निराधार आणि श्रावणबाळ योजनेतील जाचक अटी वगळून हजारो माता-भगिनींना पेन्शनचा आधार मिळवून दिला.

**गोरगरिबांचा कैवारी -** मुख्यमंत्री सहायता निधीतून लाखो रुपयांचे उपचार असोत, की हजारो बांधकाम कामगारांना मिळालेला लाभ; 'भाऊ' नेहमीच गरिबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

**शेतकरी हित असणारे नेतृत्व -** कांदा प्रश्नावर अधिवेशनात कडाडणारा आवाज आणि संगमनेरला 'हायस्पीड रेल्वे' मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री व रेल्वे मंत्र्यांकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करणारे दूरदृष्टीचे नेतृत्व!

**कठोर हिंदुत्व आणि माणुसकी असणारे नेतृत्व -** संगमनेरमधील अवैध कत्तलखान्यांवर 'योगी स्टाईल' कारवाई करून कायद्याचा वचक निर्माण केला. हिंदुत्वाचा अभिमान बाळगतानाच, प्रत्येक अडचणीत असलेल्या व्यक्तीला 'माणुसकी धर्माच्या नात्याने' मदत करणारा दिलदार नेता!

**कार्यकर्ता हीच शक्ती -** महायुतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी 'नेता' नाही, तर 'भाऊ' म्हणून पाठीशी उभे राहणारे आणि संकटात कुटुंबासारखा आधार देणारे हक्काचे व्यासपीठ!

**प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक असो किंवा तालुक्याचा कायापालट ;-** संगमनेरचा स्वाभिमान आणि विकासाचा नवा चेहरा म्हणजेच आमदार अमोलभाऊ!

माझे मोठे भाऊ आमदार अमोलभाऊ खताळ पाटील, आपणास उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो, हीच आई जगदंबेचरणी प्रार्थना!

**– शुभेच्छुक-**
**राहुल भोईर, जनसंवाद मंच, भाजपा महायुती, संगमनेर.**























दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25